महाराष्ट्र शासन

# जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर

दुरध्वनी क्र :- ०७१७२-२५२१०३ Email ID : cschandrapur@gmail.com

क्र.जिरुचं/रुप्रके/दरपत्रके/ 9020-22/२३, दिनांक :- 23 JUN 2023

प्रति,

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

विषय :- रुग्णालय प्रशिक्षण केंद, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर येथे जेवण, चहा व नाश्ता पुरविण्याकरीता दरपत्रके मागविण्याबाबत.

आपणास कळविण्यात येते कि, उपरोक्त विषयानुसार जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर येथील **रुग्णालय प्रशिक्षण केंद्र** येथे आयोजित प्रशिक्षणात वार्षीक पध्दतीने जेवण, चहा व नाश्ताचा पुरवठयासाठी वार्षीक दरकरार करण्यात येत आहे. यासाठी आपण दर सादर करावेत. सदर प्रशिक्षणात उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना १ वेळा नाश्ता, २ वेळा चहा व २ वेळा जेवण (पोटभर) द्यावयाचे आहे.

दरपत्रके सर्व करासहित सिलबंद लिफाफयात दिनांक ३० जून २०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत ५.०० (सायंकाळी) वाजेपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालयात पोहचतील अशा रितीने खालीलप्रमाणे सादर करावीत.

| अ.क्र. | उपहारगृहात पुरविण्यात येणा-या खाद्यपदार्थांची/ पेयांची यादी | विवरण | दर रक्कम रुपये (सर्व करासहीत) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | चहा | दुधाचा/काळा | |
| २ | कॉफी | | |
| ३ | नाश्ता | कांदेपोहे, उपमा, कांदाभजी, साबुदाना खिचडी, ईडली, सांबारवडा, दोसा, मिसळ इ. | |
| ४ | प्रशिक्षण/मिटींग वर्कींग लंच (व्हेज) | पुर्ण पोटभर जेवण अमर्यादित - चपात्या, २ वेगवेगळया भाज्या (सुकी व ओली), राईस/जिरा राईस, वरण, लोणचे, पापड, कढी, स्वीट, सलाद ईत्यादी. | |
| ५ | प्रशिक्षण/मिटींग वर्कींग लंच (नॉनव्हेज) | पुर्ण पोटभर जेवण अमर्यादित - (चिकन, मटन अथवा अंडाकरी), चपात्या, भात, सलाद इ. | |

- **अटी व शर्ती:**

१) पात्र अनुभवी आणि नामांकित पुरवठा धारकांकडुन सिलबंद स्वरुपात थेट टेक्निकल व कर्मशिअल स्वतंत्र लिफाफे कार्यालयाकडे पुरवठादाराने हस्ते अथवा पोस्टाने पाठविण्यात यावेत.

२) मा.जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपुर किंवा त्यांचे अधिकृत अधिकारी यांनी जेवणाच्या व्यवस्थेबद्दल वेळोवेळी दिलेले आदेश/सुचना पुरवठादारास बंधनकारक राहतील.

३) दरपत्रकांमध्ये किमान दर नमुद केलेल्या निविदाधारकाच्या पदार्थाचा दर्जा उत्कृष्ट असणे बंधनकारक आहे. दरपत्रमध्ये पदार्थाचे दर नमुद करताना ते दर बाजारभावाशी निगडीत असावेत. एखादया निविदाधारकाने पदार्थाचा दर्जा उत्कृष्ठ प्रकारचा पुरविण्याच्या हेतुने त्याने दरपत्रकात नमुद केलेले दर हे न्युनतम दर नसले तरी अशा प्रसंगी त्या दरपत्रक धारकाचा विचार होण्याबाबतचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्य चिकित्सक यांना राहतील.

४) जेवण, चहा व नाश्ता करीता दरपत्रक भरलेल्या निविदाधारकाने स्वतः सेवा दिली पाहिजे. दुस-याच्या नावे दरपत्रक भरल्याचे आढळुन आल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता पुरवठादाराशी झालेला करार रद्द करण्यात येईल.

५) प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थ्यांना सकाळी नाश्ता, २ वेळा चहा व २ वेळा जेवण पुरवावे लागेल. आवश्यकतेनुसार सांयकाळची वेळ तोंडी सुचनेनुसार वाढविण्यात येईल. तसेच पुर्वसुचना देऊन काही प्रसंगी कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी जेवणाची व्यवस्था सुरु ठेवणे बंधनकारक राहिल. तसेच दरपत्रकात नमुद केलेले सर्व पदार्थ ऑर्डरप्रमाणे रोज तयार करणे बंधनकारक राहिल.

६) पुरवठा धारकास दिलेल्या स्वयंपाकगृहात अन्न पदार्थ, घटक द्रव्य व स्वयंपाकगृहाची सर्व जागा स्वखर्चाने धुवुन, पुसून स्वच्छ ठेवावी. तसेच जागा दिवसातुन २ वेळा सकाळी व सांयकाळी जेवन देण्यापुर्वी फिनाईलने धुवून स्वच्छ करणे आवश्यक आहे व स्वंयपाक घरात/साठवण करण्याच्या जागेत कोणत्याही किटकांचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली जावी. त्याकरीता महिन्यातुन एकदा-दोनदा किटनाशक द्रव्ये पुरवठा धारक स्वखर्चाने मारुन घेणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे सरकारी मालमत्तेची/फर्निचरची व्यवस्था नीट ठेवली पाहीजे. सरकारी मालमत्तेच्या नुकसानीस पुरवठा धारक जबाबदार राहतील. तसेच जेवणाच्या जागेची किरकोळ डागडुजी टयुब, बल्ब, पाण्याची गळती, छताची गळती त्याचप्रमाणे कच-याची विल्हेवाट इत्यादी पुरवठा धारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक आहे.

७) सर्वसाधारण स्वच्छतेच्या व खाद्यपदार्थाच्या उपयुक्ततेबाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी कोणत्याही वेळी जेवणाच्या जागेची तपासणी करतील. खाद्यपेय अथवा पदार्थाच्या सेवनामुळे एखाद्या अधिकारी/कर्मचा-यास अन्न व विषबाधा झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी पुरवठा धारकाची राहिल.

८) चपात्या हया उच्च प्रतीचा गहु दळुन आणलेल्या पिठाच्या तयार करण्यात याव्यात. विकत पिठाच्या चपात्या अथवा बाहेरुन तयार करुन विकत आणलेल्या चपात्या चालणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

९) बनविल्या जाणा-या पदार्थासाठी वापरण्यात येणा-या भाज्या हया स्वच्छ व ताज्या असाव्यात. त्याचप्रमाणे मसाले इत्यादी कच्चा माल हा ब्रॅन्डेड कंपनीचा (ISI/AGMARK) असने बंधनकारक राहिल. कार्यालयाने नियुक्त केलेल्या समितीकडुन आठवडयातुन एक वेळा अचानकपणे तपासणी केली जाईल. तपासणीअंती काही त्रृटी आढळुन आल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल. तसेच ही बाब वारंवार घडल्याचे दिसुन आल्यास पुरवठा धारकाचा ताबा कार्यालयाकडुन घेण्यात येईल.

१०) पुरवठा धारकास दिलेल्या जागेत मद्यपान करणे, धुम्रपान करणे यावर बंदी राहील. आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल.

११) पुरवठा धारकास ठराविक फर्निचर पुरविले जाईल. सदर फर्निचरची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाईची जबाबदारी पुरवठा धारकाची राहिल.

१२) पुरवठा समाधानकारक नसल्याचे अथवा सेवा योग्य नसल्याचे निदर्शनास आल्यास एक महिण्याची आगाऊ नोटीस देऊन करार रद्द करण्यात येईल तसेच अनामत रक्कम रु.५०००/- शासनास जमा करण्यात येईल.

१३) दर स्विकारलेचे दिनांकापासुन १ वर्षापर्यत पुरवठा समाधानकारक चालविण्याबाबत रक्कम रु.५००/- च्या स्टॅप पेपरवर अटी व शर्ती मंजुर असलेचा करारनामा कार्यालयात सादर करावा लागेल.

१४) पुरवठा कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण झाल्यावर अनामत रक्कम रुपये ५०००/- चा धनाकर्ष परत करण्यात येईल.

१५) खाद्यपदार्थ ताजे/गरम पुरविणे बंधनकारक राहिल.

१६) काही विशिष्ठ कारणास्तव कोणत्याही वेळी व आगावु सुचना न देता करार रद्द करण्याचे अधिकार मा.जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपुर यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच सदर दरपत्रक स्विकारणे, नाकारणे अथवा हि संपुर्ण प्रक्रिया कोणतीही सबब न देता रद्द करणे याबाबतचे संपुर्ण अधिकार देखील राखुन ठेवले आहेत.

१७) स्वयंपाकगृहात काम करणा-या कामगारामध्ये बाल कामगार असता कामा नये.

१८) आपल्या प्रत्येक कर्मच्या-यांचे वर्तन नम्र असणे बंधनकारक आहे.

१९) अन्न व औषधी द्रव्य गुण नियंत्रक (एफ.डी.ए.) अधिका-यामार्फत वापरत असलेल्या पदार्थांची तपासणी करण्याचा अधिकारी अन्न व नागरी पुरवठा कायद्याप्रमाणे तत्सम अधिका-यांना राहील. गुणवत्तेच्या तपासणीचा सर्व खर्च पुरवठादाराचा राहील. तसेच महाराष्ट्र प्रिंव्हेंशन व ॲडल्टरेशन नियम १९६२ चे प्रचलीत नियम पुरवठादारास बंधनकारक राहतील. यामध्ये दंड झाल्यास सदर दंडाची रक्कम पुरवठादार भरतील.

२०) तेल, तुप इत्यादी पदार्थाचा साठा स्वतंत्र ठेवावा. अन्नधान्य ,तेल, तुप या पदार्थाशेजारी व त्याखाली कोणतेही ज्वालागृही पदार्थ ठेवु नयेत.

२१) पुरवठा धारकाने दरपत्रक समितीशी वादविवाद घालणे, हुज्जत घालणे असे प्रसंग घडल्यास तात्काळ दरपत्रक समितीच्या प्रतिनिधीस जागेचा ताबा द्यावा लागेल. पुरवठा धारक व दरपत्रक समिती यांच्यात मतभेद झाल्यास मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर यांचा अंतिम निर्णय दोघांबर बंधनकारक राहिल.

२२) दरपत्रक स्विकारणेः दरपत्रक दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये कार्यालयास सादर करावे. त्यातील लिफाफा क्रमांक १ तांत्रीक लिफाफा असेल त्यामध्ये या कार्यालयाने मागीतलेली आवश्यक कागदपत्रे असावीत व लिफाफा क्रमांक २ हा दराचा असेल. दोनही लिफाफे हे व्यवस्थित स्वतंत्र सही असलेले असावेत. लिफाफ्यावर क्रमांक नमूद करण्यात यावा.

२३) कराराचा कालावधीः सदर दरपत्रकाचा कालावधी हा दरपत्रक स्विकारल्यानंतर कराराच्या दिनांकापासुन एक वर्षापर्यंत असेल. आवश्यकता भासल्यास सदर दरांस आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्याचे संपुर्ण अधिकार या कार्यालयास राहतील.

२४) करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर उपलब्ध करुन दिलेल्या जागेचा ताबा शांततेने दरपत्रक समितीच्या प्रतिनिधीस कोणतेही कारण न देता पुरवठा धारक देतील.

२५) निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रावर दरपत्रक धारकाची स्वाक्षरी असने आवश्यक आहे. तसे नसेल तर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

२६) दरपत्रक कराराबाबतच्या सर्व सुचना व अटी काळजीपुर्वक वाचाव्यात. त्याप्रमाणेच दरपत्रके कार्यालयास सादर करावेत. नंतर कोणत्याही प्रकारची विनंती मान्य करण्यात येणार नाही.

२७) दरपत्रकातील दर हे कोणत्याही चुकिशिवाय काळजीपुर्वक स्पष्ट नोंदविण्यात यावे. खाडाखोड केलेले नसावेत.

२८) स्वयंपाक गृहातील वस्तु/खाद्यपदार्थ कार्यालयास मागणीनुसार अधिकारी/कर्मचारी यांचे टेबलापर्यंत आणुन देणे बंधनकारक व विनामुल्य राहिल.

२९) दिलेल्या विहित मुदतीनंतर दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

३०) प्रशिक्षण/मिटींग असल्याचे ऑर्डर १ दिवस आधी देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीत रोज वेगवेगळ्या भाज्यांचा समावेश असावा. मेनुमध्ये नमुद केलेल्या भाज्या, गोड पदार्थ इत्यादी आपण निविदेमध्ये नमुद केलेल्या दरानुसार स्वादिष्ठ व रुचकर पध्दतीने तयार करुन देणे बंधनकारक राहील.

- **तात्रीक लिफाफा क्रमांक-१ यामध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे समाविष्ट असावित.**

१) रेशन कार्ड किंवा सक्षम प्राधिका-याने दिलेला रहिवासी दाखला (डोमीसाईल) सांक्षांकित छायाप्रत.

२) पुरवठा धारकाचे आधार कार्ड व पॅन कार्ड सांक्षांकित छायाप्रत.

३) प्रशासकिय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर यांचे नावे अनामत रक्कम रुपये ५०००/- बॅंकेचा धनाकर्ष.

४) शॉप ॲक्टनुसार नोंदणी परवान्याची व अद्यावत कालावधीसाठी नुतनीकरण ग्राहय असल्याचा परवाना प्रमाणपत्राची सांक्षांकित छायाप्रत.

५) अन्न व औषध प्रशासन विभाग (एफ.डी.ए.) यांचेकडील अद्यावत परवाना सांक्षांकित छायाप्रत.

६) स्वयघोषणापत्र व प्रतिज्ञापत्रे (प्रपत्र १, प्रपत्र २ , प्रपत्र ३)

- **व्यापारी लिफाफा/दर लिफाफा क्रमांक -२**

या लिफाफ्यामध्ये **सर्व करासहीत** दर नमुद करावेत. दर नमुद केलेल्या प्रत्येक पृष्ठावर दरपत्रधारकाने स्वाक्षरी केलेली असावी व फर्मचा रबरी शिक्का मारलेला असणे आवश्यक आहे. दोनही लिफाफ्यावर डाव्या बाजुस तांत्रीक लिफाफा क्रमांक १ व दर लिफाफा क्रमांक २ असे दर्शविण्यात यावे. वरील दोनही लिफाफे एका मोठया लिफाफ्यामध्ये बंद करुन कार्यालयाचे नावे सादर करावेत.

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर

प्रत प्रसिध्दीकरीताः १) कार्यालयीन नोटीस बोर्ड.
२) जिल्हा परीषद, चंद्रपूर वेबसाईट
www.zpchandrapur.co.in

## प्रपत्र -१

## स्वयंघोषणापत्र

मी/आम्ही ..........................................................................................र.........................

तालुका..................... जिल्हा............................. सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो कि, जिल्हा रुग्णालयातील, रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, चंद्रपुर येथे जेवण, चहा व नाश्ता पुरविण्यासाठी दरपत्रक सुचना करीता ........................ .......................... या फर्मने दरपत्रक सादर केलेले असुन सदर दरपत्रक मी/आम्ही जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील आवक विभागाकडे सिलबंद पाकिटामध्ये सादर केलेले सर्व कागदपत्रे / माहिती खरी असुन मी अथवा माझे फर्मचे नाव कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने उपहारगृह चालक / खाद्यपदार्थ पुरवठादारांच्या काळया यादीत टाकलेले नाही अथवा अपात्र ठरविलेले नाही. मी/ माझे फर्मने उक्त दरपत्रक अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहीती खोटी आढळल्यास भा.द.वि. कलम १९९, २०० अन्वये मी शिक्षेस पात्र राहील. तसेच मी सादर केलेले दरपत्रक अवैध ठरेल याची मला जाणीव आहे.

ठिकाणः- .............

दिनांक :-.............

स्वयंघोषणापत्र करणा-यांचे नाव, सही व फर्मचा शिक्का

## प्रपत्र -२

## निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही ................................................................ ...रा..............................

तालुका..................... जिल्हा........................... जिल्हा सामान्य रुग्णालयातील, रुग्णालय प्रशिक्षण केंद्र,चंद्रपुर येथील उपहारगृह दरपत्रकावर चालविण्यास सोबत जोडलेल्या प्रमाणे तांत्रीक व व्यापारी लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करीत असुन सदर दरपत्रक सुचना आणि अटी व शर्ती मी/आम्ही पुर्णपणे वाचलेल्या असुन सदर अटी व शर्ती मान्य असुन सदर अटी व शर्तीच्या आधिन राहुन मी/आम्ही सदर दरपत्रक सादर करीत आहोत.

ठिकाणः- .............

दिनांक :-.............

दरपत्रकधारकाचे नाव, सही व फर्मचा शिक्का

## प्रपत्र-३

## प्रतिज्ञापत्र

मी/ आम्ही मी/आम्ही ........................................................... ...रा.......................... तालुका..................... जिल्हा............................ याव्दारे प्रतिज्ञापत्र सादर करतो की, मी/आम्ही सादर केलेले दरपत्रक मंजुर झाल्यास उपहारगृह व उपहारगृहातील खाद्यपदार्थ मी/आम्ही उच्च गुणवत्तेने पुरवठा करेल व या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ साधन सामग्री उपलब्ध ठेवेल. मला/आम्हाला याबाबत पुर्ण कल्पना आहे की माझ्या/ आमच्या कामकाजात कोणत्याही प्रकारची दिरंगाई/ कसुर अथवा हलगर्जीपणा झाल्यास जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय निश्चित करेल अशा दंडास अथवा कायदेशिर शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहीन. दरपत्रकातील अटी व शर्ती मला / आम्हाला मंजुर असुन त्या अटी व शर्तीचे मी/आम्ही पुर्णपणे पालन करीन.

ठिकाणः- .............

दिनांक :-.............

दरपत्रकधारकाचे नाव, सही व फर्मचा शिक्का